॥ आज गोकुळांत रंग खेळतो हरी ॥

गायिकाः लता मंगेशकर
गीतः सुरेश भट
संगीतः पं. हृदयनाथ मंगेशकर

आज गोकुळांत रंग खेळतो हरी
राधिके जरा जपून जा तुझ्या घरी ॥ धृ. ॥

तो चटोर चित्तचोर वाट रोखतो
हात ओढुनी खुशाल अंग टाकतो।
रंगवून रंगुनी गुलाल फासतो
सांगते अजूनही तुला परोपरी ॥ १ ॥

सांग श्यामसुंदरास काय जाहलें?
रंग टाकल्याविना कुणा न सोडलें।
ज्यास त्यास रंग रंग रंग लागले
एकटीच वांचशील काय तूं तरी? ॥ २ ॥

त्या तिथें अनंगरंग रास रंगला
गोपगोपिकांसवें मुकुंद दंगला।
तो पहा मृदंग मंजिऱ्यांत वाजला।
हाय वाजली फिरून तीच बांसरी
राधिके जरा जपून जा तुझ्या घरी ॥ ३ ॥